| **Publication** – Tarun Bharat | **Page No** - 06 |
|---|---|

# रबर प्रदर्शनासाठी नाशिकमध्ये 'रोड शो'

**आशियातील सर्वात मोठे प्रदर्शन**

**नाशिक, दि. १३ (प्रतिनिधी):** इंडिया रबर एक्सपो (आयआरई)च्या वतीने आयोजित आशिया खंडातील सर्वात मोठ्या रबर प्रदर्शनाससाठी नाशिकमध्ये रोड शोचे आयोजन करण्यात आले. २००१ पासून सदर प्रदर्शन आयोजनास प्रारंभ झाला आहे. मुंबईत जानेवारी, २०१९ मध्ये सदर प्रदर्शन होणार आहे. आयोजनाच्या सुरुवातीच्या वर्षापासून रबर उद्योगातील अनेकांचे लक्ष सदर प्रदर्शनाकडे लागलेले असते. २०१९ मध्ये दहावे आंतरराष्ट्रीय प्रदर्शन आणि परिषद मुंबई येथील 'बॉम्बे एक्झिबिशन सेंटर'मध्ये आयोजित केले जाणार आहे. सदर प्रदर्शनाच्या प्रसिद्धीसाठी हा रोड शो आयोजित करण्यात आला होता.

१९४५ साली स्थापन झालेल्या 'ऑल इंडिया रबर इंडस्ट्रिज असोसिएशन' अर्थात आयआरइ या संस्थेच्या वतीने सदर प्रदर्शन आयोजित करण्यात येणार आहे. संस्थेचे सध्या १,२०० सक्रिय उद्योजक सभासद असून, आयआरइ भारतातील १५ शहरांमध्ये 'इंडिया रबर एक्सपो २०१९' ला प्रोत्साहन देण्यासाठी रोड शोचे आयोजन करत आहे. हा रोड शो अहमदाबादपासून सुरू होऊन, देशातील १५ शहरांमध्ये फिरून, जागरुकता निर्माण करणार आहे. आयआरई २०१९ चे अध्यक्ष आणि 'ओरिएंटल रबर इंडस्ट्रिज प्रा. लि'चे अध्यक्ष आणि व्यवस्थापकीय संचालक विक्रम मकार यांनी याबाबत माहिती देताना सांगितले की तीनशेच्या आसपास संख्येने प्रदर्शक २६ हजार चौरस मीटरहून जास्त क्षेत्रफळ असलेल्या प्रदर्शन भागात आपले स्टॉल लावणार आहेत. आयआरइचे मुख्य संपर्कप्रमुख विष्णू भीमराजका, यांनी सांगितले की आजमितीस रबर उत्पादनास बाजारपेठेत उत्तम मागणी आहे. विविध उद्योगांत रबराचा वाढणारा उपयोग हा या उद्योगाचे उज्ज्वल भविष्य मांडत आहे. सर्वात जास्त रोजगार मिळवून देण्याची क्षमता या उद्योगात असुन त्याच्या वाढीसाठी आयआरइ च्या माध्यामातुन सक्रिय प्रयत्न केले जातात. यावेळी संघटनेचे उमेश ध्रुव, विनोद बन्सल, येझदी पटेल आदी उपस्थित होते.

## नाशिक महत्त्वाचे औद्योगिक क्षेत्र

मुंबईपासून नाशिकची असणारी नजीकता, मोठ्या प्रमाणात येणारे उद्योग आणि नैसर्गिक साधनांची असणारी मुबलकता यामुळे नाशिक महत्त्वाचे औद्योगिक क्षेत्र ठरत आहे. नाशिकचा विचार कोणत्याही उद्योजकास करावाच लागतो. त्यामुळे या रोड शोमध्ये आम्ही आग्रहाने नाशिकचा समावेश केला आहे. असे आयआरईच्या वतीने यावेळी सांगण्यात आले.